# कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब

## वाचन कट्टा ग्रंथालय विभागाचा अभिनव उपक्रम
## दिनांक १६ सप्टेंबर, २०१९

'वाचाल तर वाचाल' ही म्हण आजच्या घडीला समर्पक आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचन वेड उत्पन्न व्हायचे असेल तर तशी परिस्थिती त्यांच्याभोवती निर्माण होणे गरजे आहे. हा उद्देश डोळयासमोर ठेऊन महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने व प्राचार्य डॉ. केशवराव फाले यांच्या मार्गदर्शनाखाली 'वाचन कट्टा' या अभिनव उपक्रमाची सुरूवात महाविद्यालयात करण्यात आली. 'वाचन कट्टा' या अभिनव उपक्रमाची मुळ संकल्पना मांडताना असे म्हटले की, आजच्या युगातील तरूणांना वाचनाचे वेड असायला हवे, तरच वाचन संस्कृतीत वाढ होईल आणि पर्यायाने त्याचा उत्तम युवापिढी घडण्यासाठी उपयोग होईल.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपला आठवडयातील एक दिवस वाचन कट्टयामध्ये भाग घेऊन एक तास एखाद्या ग्रंथावर चर्चा घडवून आणण्याकरिता द्यावा असे आवाहन त्यांनी केले. याकरिता त्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामगीता' या ग्रंथाच्या माध्यमातून चर्चा घडवून आणली व एक उदाहरण शिक्षक व विद्यार्थ्यांसमोर ठेवले. यादृष्टीने या उपक्रमात सातत्य ठेऊन वाचन संस्कृती जोपासण्याचे आवाहन यावेळी प्राचार्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले.








